**आहिल्यानगर महानगरपालिका,आहिल्यानगर-४१४००१**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक आहिल्यानगर महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड,
आहिल्यानगर महानगरपालिका,
आहिल्यानगर-४१४००१.

मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेले मा.प्रशासक यांजकडेस निर्णयार्थ सादर करावयाचे विषय.

कार्यसूची :- ६५

दिनांक - ०७ /१०/२०२५ वेळ :- सकाळी १०.०० वाजता

| अ.क्र | विषय क्र | विषय |
|---|---|---|
| १ | ६०७ | अहिल्यानगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये श्री. सामल राजेंद्र बालराज यांची मानधनावर नियुक्तीबाबत. |
| २ | ६०८ | अहिल्यानगर महानगरपालिका रस्ता बाजु मांडणी फि व स्लॉटर फी प्रभाग समिती क्र.२व ३ करीता नव्याने फेर ई - निविदा क्र २०२५ANMC-१२०३८७९-१ निविदेच्या मान्यते बाबत. |
| ३ | ६०९ | महानगरपलिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र.०१ माउली नगर परिसरातील बंद पाईप गटार व रस्ते कॉक्रीटीकरण करणे.ईनि.क्र. ११९६९१४-०२ या निविदेच्या मंजुरी बाबत. |
| ४ | ६१० | महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकास योजने अंतर्गत दक्षता नगर व अभय नगर भागातील व परीसरातील बंद पाईपे गटर करणे, रस्ते कॉक्रीटीकरण करणे ई नि. क्र. ११९६९१४-०३ या निविदेच्या मंजुरी बाबत. |

मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -६५**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०७ विषय क्र - ६०७
दिनांक :-०७ /१०/२०२५ विभाग- घनकचरा व्यवस्थापन

---

**विषय :-** घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये श्री. सामल राजेंद्र बालराज यांची मानधनावर नियुक्तीबाबत.

**--**--**

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, घनकचरा व्यवस्थापन विभागामधील मानधनावर नियुक्तीवरील स्वच्छता निरीक्षक श्री.राजेंद्र बालराज सामल यांची दि.२५/०९/२०२५ रोजी मुदत संपुष्टात येत असल्याने त्यांनी मानधन तत्वावर नियुक्ती करणेकामी विनंती अर्ज सादर केलेला आहे.त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ५३ नुसार श्री.राजेंद्र बालराज सामल यांची स्वच्छता निरीक्षक यापदी तीन दिवसांचा तांत्रीक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता नियुक्ती करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६५**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०८ विषय क्र - ६०८
दिनांक :-०७ /१०/२०२५ विभाग- मार्केट विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका रस्ता बाजु मांडणी फि व स्लॉटर फी प्रभाग समिती क्र.२ व ३ करीता नव्याने फेर ई - निविदा क्र २०२५ANMC-१२०३८७९-१ निविदेच्या मान्यते बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करिता प्रभाग निहाय खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी ऑनलाईन पध्दतीने प्रभाग समिती क्र.१ साठी ई निविदा क्र २०२५ANMC-१२०३८७९-१ निविदा सुचना क्र.१० मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली होती. त्याची मुदत दि.२४/०७/२०२५ ते ०८/०८/२०२५ अशी होती. सदर तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तांत्रिक लिफाफा उघडला असता १) मे. वंशिका एंटरप्रायजेस, भिंगार, अहिल्यानगर २) मे. ओम साईराम बहुउद्देशीय सेवा संस्था, अहिल्यानगर व ३) मे. ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नाशिक यांची निविदा प्राप्त झालेली आहे.

सदर निविदेच्या अनुषंगाने मा. छाननी समितीची दिनांक २०-०८-२०२५ रोजी दुपारी १२:०० वा. बैठक संपन्न झालेली आहे. छाननी समितीमध्ये निविदाधारक १ मे. वंशिका एंटरप्रायजेस, भिंगार, अहिल्यानगर व २ मे. ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नाशिक यांचे कागदपत्रक अपुर्ण असल्याने त्यांना अन्वये कागदपत्राची पुर्तता करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. त्यांनी कागदपत्राची पुर्तता करण्यात आलेली आहे. तसेच मे. वंशिका एंटरप्रायजेस, अहिल्यानगर हरकत घेतलेली आहे. तसेच मे.ओम साईराम बहुउद्देशीय सेवा संस्था यांनी हरकत घेतलेली आहे.

वरील हरकतीनुसार या विभागाने प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये मे.ओम साईराम बहुद्देशीय सेवा संस्था यांची निविदा अपात्र ठरविण्यात येवुन म. वंशिका एंटरप्रायजेस, भिंगार, अहिल्यानगर व मे ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नशिक यांच्या निविदा पात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिनांक १९-०९-२०२५ रोजी सदर व्यापारी लिफाफा उघडणे बाबत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार व्यापारी लिफाफा दिनांक २३-०९-२०२५ रोजी उघडला असाता, खलिल प्रमाणे १ वर्षासाठी देकार रक्कम देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | मनपाने निश्चित केलेली देकार रक्कम | ठेकेदाराने निविदेमध्ये नमूद केलेली देकार रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.वंशिका एंटरप्रायजेस भिंगार,अहिल्यानगर | ८,४०,०००/-+१८% GST | ८,५१,०००/- +१८% GST |
| २ | मे.ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नाशिक | ८,४०,०००/-+१८% GST | ८,४५,०००/- +१८% GST |

तरी प्रभाग समिती क्र.१ करिता ई निविदा क्र. २०२५ANMC-१२०३८७९-१ निविदा सुचना क्र.१० मध्ये १) मे वंशिका एन्टरप्रायजेस ,भिंगार,अहिल्यानगर यांनी निविदेमध्ये देकार रक्कम रू. ८,५१,०००/- +१८% GST व २) मे ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नाशिक यांनी निविदेमध्ये देकार रक्कम रू. ८,४५,०००/- +१८% GST नमुद केलेले आहे.

तसेच वाटाघाटी/तडजोड करणेसाठी बोलविण्यात आलेले आहे. तडजोडीमध्ये ठेकेदाराने निविदा प्रसिध्द करतांना आपण निविदेची रक्कम निश्चित केलेली असल्याने त्यानुसार आम्ही देकार रक्कम दिलेली आहे. त्यामुळे कोणतीही रक्कम वाढवुन दिलेली नाही.

तरी मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांची देकार रक्कम जास्त असल्याने प्रभाग समिती क्र. २ & ३ साठी ई निविदा क्र. २०२५ANMC-१२०३८७९-१ निविदा सुचना क्र.१० चा ठेका देकार रक्कम रू.८,५१,०००/- + १८% GST लावून म्हणजे रू.१०,०४,१८०/- इतकी रकमेस निविदेमधील नमुद अटी - शर्तीनुसार एक वर्षासाठी देणेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६५**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०९ विषय क्र - ६०९
दिनांक :-०७ /१०/२०२५ विभाग- सार्व. बांध. विभाग

---

**विषय :-** महानगरपलिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र.०१ माउली नगर परिसरातील बंद पाईप गटार व रस्ते कॉक्रीटीकरण करणे.ईनि.क्र. ११९६९१४-०२ या निविदेच्या मंजुरी बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, उपरोक्त विषयान्वये खलिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे

१) ई नि क्र. ११९६९१४-०२ सन २०२५-२०२६ म.न.पा.च्या संकेस्थळावर दि. ०३/०७/२०२५
२) निविदा विक्री कालावधी दि. ०३/०७/२०२५ ते १०/१०/२०२५
३) निविदा स्विकारण्याची तारीख दि. ०३/०७/२०२५ ते १०/०७/२०२५
४) कामाची मुदत ८ महिने

दि. ०९-१०/०९/२०२५ रोजीच्या मा. छाननी समीतीचे शिफारशीनुसार.

| ई निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम gst व्यतिरिक्त (सुधारीत अंदापत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई नि क्र, ११९६९१४-०२ | प्रभाग क्र, ०१ मधील माउली नगर परिसरातील बंद पाईप गटार व रस्ते कॉक्रीटकरण करणे गार्गे ते श्री, चैतन्य अपार्टमेंट आणि मगर ते आणेराव अणि संसारे ते शेख आणि भास्कर ते मुळे आणि साळवे ते पवार आणि सुपेकर ते ठुबे आणि मोहन जाधव ते ढोले आणि पंडीत ते नाबडे ते कराड आणि जावळे ते ठोंबरे ते माया कुंज बंगलो आणि काळाभोर ते कलापुरे ते घोरपडे आणि बोरकर ते काळे ते पवार घर | १,२४,७९,०६३/- | श्री, चेतन मारूती जाधव, अहिल्यानगर<br>श्री, अभिजीत अशोक काळे, अहिल्यानगर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने<br>अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०% जादा दराने | श्री, चेतन मारूती जाधव अ, नगर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्र्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक श्री. चेतन मारूती जाधव, अहिल्यानगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्ट्या कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने प्राप्त झालेली असून सदरचे दर वाजवी वाटत आहेत.

तरी श्री. चेतन मारूती जाधव, अहिल्यानगर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६५**

मा.प्रशासक ठराव क्र. ६१० विषय क्र - ६१०
दिनांक :-०७ /१०/२०२५ विभाग- घनकचरा व्यवस्थापन

---

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकास योजने अंतर्गत दक्षता नगर व अभय नगर भागातील व परीसरातील बंद पाईपं गटर करणे, रस्ते कॉक्रीटीकरण करणे ई नि. क्र. ११९६९१४-०३ या निविदेच्या मंजुरी बाबत.

**--**--**

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, उपरोक्त विषयान्वये खलिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे

१)ई नि क्र. ११९६९१४-०२ सन २०२५-२०२६ म.न.पा.च्या संकेस्थळावर दि. ०३/०७/२०२५
२)निविदा विक्री कालावधी दि. ०३/०७/२०२५ ते १०/१०/२०२५
३)निविदा स्विकारण्याची तारीख दि. ०३/०७/२०२५ ते १०/०७/२०२५
४)कामाची मुदत ६ महिने

दि. ०९-१०/०९/२०२५ रोजीच्या मा. छाननी समीतीचे शिफारशीनुसार.

| ई निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम gst व्यतिरिक्त (सुधारीत अंदापत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई नि क्र, ११९६९१४-०३ | दक्षतानगर व अभयनगर भागातील त परिसरातील बंद पाईप गटार करणे, रस्ते कॉक्रीटीकरण करणे. ( अभयनगर अंतर्गत जुना पिंपळगांव रोड ते सोनवणे आणि भागवत ते जुना पिंपळगांव आणि ढवण ते तुंगार त घुले ते धाडगे आणि रामदास ढवण ते दळवी आणि काळे ते केकाण आणि सांयबर ते सिताई बंगलो) | ८३,३२,३७५/- | श्री, चेतन मारूती जाधव, अहिल्यानगर<br>श्री, अभिजीत अशोक काळे, अहिल्यानगर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने<br>अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०% जादा दराने | श्री, चेतन मारूती जाधव अ, नगर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्र्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक श्री. चेतन मारूती जाधव, अहिल्यानगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्ट्या कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने प्राप्त झालेली असून सदरचे दर वाजवी वाटत आहेत.तरी श्री. चेतन मारूती जाधव, अहिल्यानगर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका